# पंचायत समिती वाडा

# कृषी विभाग

कृषी विभागा मार्फत राबविण्यात येण्या-या राष्ट्रीय बायोगॅस योजनेंतर्गत वाडा गटांस 31 चा लक्षांक देण्यात आला होता. त्यानुसार 31 बायोगॅस बांधुन पुर्ण झाले असुन लक्षांक पुर्ण केलेले आहे. तसेच वाडा गटात भात पिकाखाली एकुण 14955 हेक्टर क्षेत्र असुन रब्बी हंगामात 2555 हेक्टर क्षेत्रावर कडधान्य भाजीपाला , गळीत धान्य , फळे व फुले इत्यादी उत्पादन घेतले जाते. बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेअंतर्गत 80 सिंचन विहिरींचा लक्षांक होता. त्यानुसार 165 सिंचन विहिरींना तांत्रिक व प्रशासकिय मंजुरी दिली असुन 80 सिंचन विहीरीचे काम प्रगतीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेअंतर्गत 3 सिंचन विहिरींचा लक्षांक होता. त्यानुसार लक्षांक पुर्ण करण्यात आला आहे. 50% अनुदानावर भात बियाणे 132.4 क्विंटल , हरभरा बियाणे 20.10 क्विंटल , भाजीपाला मिनीकट 100 पाकिटे वाटप करण्यात आलेली आहेत. जि. प. सेस योजनेतर्गत डि बी.टी. तत्वावर खरेदी करण्यात आलेल्या कडबा कुटटी , स्प्रे पंप , विदयुत मोटार , ग्रासकटर , ताडपत्री खरेदी केलेल्या शेतक-यांना 50% अनुदान देण्यात आलेले आहे. मोगरा लागवड या योजनेंतर्गत 50 शेतक-यांना ( गारगाव ग्रामपंचायत ) प्रोत्साहनपर 75% अनुदान देण्यात आलेले आहे. मग्रारोहयो योजनेंतर्गत 32.20 हेक्टर क्षेत्रावर शेवगा लागवड करण्यात आलेली आहे.